प्रेस नोट ता. १९/०७/२०२३    पोलीस स्टेशन - वाकड

**माळशिरस जि.सोलापुर येथे लाखो रुपयांची बॅक फोडी करणारे टोळीतील दोन चोरटयांना १२ तासात गुन्हयातील मुद्देमालासह अटक**

**वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी.**

— oo —

वाकड पोलीस स्टेशन हद्दीत दि.०९/०७/२०२३ रोजी फेड बॅक, डांगे चौक वाकड येथे दरोडा टाकण्याचा केलेला प्रयत्न पोलीसांचे सतर्कते मुळे निष्फळ झाला होता. सदर गुन्हयात बॅकेंची भिंत फोडुन गॅस कटरने तिजोरी फोडण्याचा प्रयत्न झाला होता हे निष्पन्न झालेने सदर गुन्हयाची दखल घेत **मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड** यांनी सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी, क्राईम युनिट यांना रात्रीचे वेळी जास्तीत जास्त पोलीस अधिकारी व कर्मचारी नेमुन सतर्क नाकाबंदी करुन, बँका, ज्वेलर्स शॉपी तपासणी करणेबाबत आदेश दिले आहेत.

सदरबाबत दाखल असलेला वाकड पोलीस स्टेशन गु.रजि.नं. ६५१/२०२३ भादविक ३९५,३९८,३०७, ३५३,४५८,५११, आर्म ॲक्ट ४,२५, महा.पोलीस कायदा कलम ३७(१)(३) मध्ये ०५ आरोपी अटक करणेत आले असुन उर्वरीत आरोपींबाबत मा.श्री.गणेश जवादवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाकड पोलीस ठाणे यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या तपास पथकातील सपोनि संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण व तपास पथक अंमलदार यांना सखोल तपास करुन सर्व आरोपींना अटक करणेबाबत सुचना दिल्या आहेत.

त्याप्रमाणे सपोनि.संतोष पाटील व पोलीस स्टाफ असे पाहीजे आरोपींचा शोध घेणेकरीता पेट्रोलींग करीत असताना सपोनि.संतोष पाटील यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, दि.१८/०७/२०२३ रोजी **माळशिरस जि.सोलापुर येथे घडलेले गु.रजि.नं.३८८/२०२३ भादविक ४५७,४५४,३८०,३४** या बॅक चोरीचे गुन्हयातील संशयीत आरोपी हा मोहननगर रोड, पिंपरी पुणे येथे येणार आहे. सदर बातमीचा आशय वरिष्ठांना सांगुन त्यांचे परवानगीने एम्पायर इस्टेट रोड, मोहननगर पिंपरी पुणे येथे जावुन तेथे जावुन मोरवाडी कोर्टाकडे जाणारे रोडलगत सापळा रचुन थांबले असता तेथे एक पांढरे रंगाची स्विफ्ट डिझायर कार नं.एमएच.१४.एचक्यु.९७८१ मधुन मिळाले बातमीतील संशयीत इसम व त्याचे सोबत आणखी एक इसम असे उतरलेने लागलीच स्टाफचे मदतीने त्यांना ताब्यात घेवुन त्यांची नाव पत्ते विचारले असता त्यांनी आपली नावे १) फैसल इब्राहीम शेख वय २९ वर्षे रा.सावंत यांच्या खोलीमध्ये भाडे तत्वावर, विजयनगर, पिंपळेगुरव, पुणे मुळ रा. सेक्शन ३९, विर तानाजी नगर, एकता मित्र मंडळजवळ, उल्हासनगर-५, जि.ठाणे. २) शाहरुख सत्तार पटवारी वय २८ वर्षे रा.द वाईट हाऊस हॉटेलच्या पाठीमागील चाळीमध्ये, औंध पुणे मुळ रा. मुपो. तळनी ता.औसा जि.लातुर अशी सांगीतली. त्यांना विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्यांनी माळशिरस जि.सोलापुर येथे बॅक फोडुन चोरी केलेची कबुली दिलेने,त्यांची अंगझडती घेतली असता त्यांचे ताब्यातुन चोरीतील **रोख रक्कम ४,१०,०००/- रुपये** जप्त करणेत आली आहे.

आरोपी ताब्यात घेतले नंतर सदरची माहीती सोलापुर पोलीसांना कळवुन आरोपी व स्विफ्ट कार नं. एमएच.१४.एचक्यु.९७८१ असे पुढील कार्यवाही करीता सोलापुर ग्रामीण स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागातील पोलीस पथकाचे ताब्यात दिले आहे.

सदरची कारवाई मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.श्री.डॉ.संजय शिंदे सो, सह.पोलीस आयुक्त, मा.श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. डॉ.काकासाहेब डोळे सो, पोलीस उप आयुक्त,परि-२, पिंपरी चिंचवड, मा. श्री.डॉ. विशाल हिरे, सहा.पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री.गणेश जवादवाड वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री.रामचंद्र घाडगे पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि.संतोष पाटील,पोउपनि.सचिन चव्हाण, सपोफौ.बाबाजान इनामदार, सपोफौ.राजेंद्र काळे, पोहवा.वंदु गिरे, पोहवा.संदीप गवारी, पोहवा.अतिश जाधव, पोहवा.प्रमोद कदम, पोना.प्रशांत गिलबीले, पोना.अतिक शेख, पोना.विक्रांत चव्हाण, पोना.राम तळपे, पोशि.अजय फल्ले, पोशि.भास्कर भारती, पोशि.स्वप्निल लोखंडे, पोशि.सौदागर लामतुरे, पोशि.विनायक घारगे, पोशि रमेश खेडकर, पोशि.सागर पंडीत (परि-०२ कार्यालय) यांनी मिळुन केली आहे.

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड